नाशिक, रविवार, दि. १० एप्रिल २०१६ लोकमत

# टाकळी देवस्थानात व्याख्यानमाला

## आध्यात्मिक जागर : रामनवमीपासून होणार शुभारंभ

नाशिक : आगरटाकळी येथील श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत श्री समर्थ रामदासस्वामी मठाच्या वतीने श्रीरामनवमी ते हनुमान जयंती या कालावधीत दि. १५ ते २२ एप्रिलदरम्यान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विश्वस्त मंडळाने दिली आहे.

रामनवमीला दि. १५ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता रामजन्मोत्सव साजरा होणार असून, सायंकाळी ६ वाजता व्याख्यानमालेचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एम. ढवळे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पहिले पुष्प प्रकाश पाठक हे 'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' या विषयावर गुंफणार आहेत. दि. १६ रोजी माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचे 'संत साहित्य आणि आपण', दि. १७ रोजी यशवंत पाठक यांचे 'उत्कट तेची घ्यावे', दि. १८ रोजी कॅप्टन अतुल इंदुरकर यांचे 'गुरु परंपरा व नामाचे महात्म्य', दि. १९ रोजी सचिन कानेटकर यांचे 'जय जय रघुवीर समर्थ', दि. २० रोजी संजय गोडबोले यांचे 'मानवी जीवनातील धर्माची आवश्यकता', दि. २१ रोजी ऋतुजा वाळिंबे यांचे 'श्री हनुमान चरित्र', तर दि. २२ रोजी स्वामी जोमानंद महाराज यांचे 'जीवन देवाचे, आचरण माणसाचे' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

याचबरोबर दि. २२ रोजी हनुमान जन्मोत्सव साजरा करण्याबरोबरच स्वराली जोगळेकर, ऋतुजा नाशिककर व वैदेही नाशिककर यांचा भक्तिगीतांचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ६ वाजता ऋतुजा वाळिंबे यांचे 'हनुमान चरित्र' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि ट्रस्टचे अध्यक्ष एन. के. ब्रह्मे आणि विश्वस्त मंडळाने केले आहे. (प्रतिनिधी)